महानगरपालिका, नगरपरिषद / नगरपंचायती /जिल्हापरिषद / पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुका
जनमत चाचणी आणि मतदानोत्तर चाचणीचे निष्कर्ष प्रसिध्द करण्याबाबतचे निर्देश.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
क्रमांक - रानिआ/ मनपा-२०१७/प्र.क्र.७/का.५
दिनांक :१५ एप्रिल, २०१७

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३-झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी; राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची राज्य निवडणूक आयोगावर सांविधानिक जबाबदारी आहे.

३. आणि ज्याअर्थी; जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदान समाप्तीपर्यंतच्या कालावधीत जनमत चाचणी अथवा मतदानोत्तर चाचणीचे निष्कर्ष प्रसिध्द केल्यास त्याचा मतदारांवर प्रभाव पडू शकतो.

४. त्याअर्थी; महानगरपालिका, नगरपरिषदा / नगरपंचायत, जिल्हापरिषद व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये जाहीर प्रचार करण्याचा कालावधी संपल्यानंतर मतदान समाप्त होईपर्यंतच्या कालावधीत जनमत चाचणी (Opinion poll) आणि मतदानोत्तर चाचणी (Exit Poll) यांचे निष्कर्ष प्रसिध्द करण्यावर बंदी राहील असे आदेशित करण्यात येत आहे.

वर्तमानपत्रे, नियतकालिके, माहितीपत्रके, फलक किंवा तत्सम प्रसिध्दी, खाजगी किंवा सरकारी रेडीओ, टि.व्ही. केबल, डीटीएच, प्रादेशिक किंवा स्थानिक केबल टि.व्ही., सॅटेलाईट, एसएमएस, इंटरनेट, फेसबुक आणि तत्सम उपलब्ध सोशल मिडिया यांच्याद्वारे जनमत चाचणी व मतदानोत्तर चाचणी यांचे असे कुठलेही निष्कर्ष प्रसिध्द करता येणार नाहीत.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व महानगरपालिका आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी / सर्व कार्यासने.
४) मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे स्वीय सहायक.
५) सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक.
६) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग.
७) निवड नस्ती.